Inaugration of
Soft Skill & Spoken English Course




Scanned by CamScanner



Scanned by CamScanner




Scanned by CamScanner

# स्पर्धेत संख्येपेक्षा जिंकण्यासाठी सहभागी व्हा : शिंदे

## एलबीपी महाविद्यालयात यूपीएससी, एमपीएससी विषयावर कार्यशाळा, स्पर्धा परीक्षांच्या तयारीवर द्या भर

प्रतिनिधी । सोलापूर

विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा तंत्र अवगत करून जिद्द, चिकाटीच्या जोरावर यश संपादन करावे. प्रशासकीय सेवा व आयटी क्षेत्र यांची तुलना करू नये. प्रशासकीय सेवेत कमी वेतन मिळत असले तरी समाजसेवा आहे म्हणून या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊ नका. जिंकण्यासाठी सहभागी व्हा, असे आवाहन वरिष्ठ पोलिस अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी केले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात यूपीएससी व एमपीएससी वर मोफत कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य सीताराम गोसावी उपस्थित होते.

प्रारंभी शाहीर अमर शेख जन्म शताब्दीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी पोलिस अधिकारी दत्तात्रय कोळेकर, प्रा. आनंद शिंदे, डॉ. संतोष राजगुरू, डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ. प्रशांत नलवडे, डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. सुरेश ढेरे, निशा भोसले उपस्थित होते.

श्री.शिंदे म्हणाले की, स्पर्धा परीक्षा कठीण नसते. योग्य मार्गदर्शन, अभ्यास, सातत्य याची जोड असल्यास यश हमखास मिळते. परीक्षेसाठी दररोज वृत्तपत्रातील संपादकीय लेख वाचले पाहिजे. पाठ्यपुस्तक, व्याकरण, प्रश्नपत्रिका संच याचा अभ्यास केला पाहिजे. संयम ठेवून शिस्तीने स्मार्ट कार्य केले पाहिजे. तसेच अपयशाने खचून न जाता प्रयत्नांमध्ये सातत्य ठेवावे.

हर्षल शिंदे यांनी स्पर्धा परीक्षेच्या आराखड्याचा नीट अभ्यास करून अभ्यासास सुरवात करावी. तसेच अभ्यास करताना नियमितता असावी, पुस्तक, ग्रंथ यांचा बदललेल्या अभ्यासक्रमानुसार अभ्यास केल्यास नक्कीच यश मिळेल असे मार्गदर्शन केले.

स्पर्धा परीक्षेमध्ये अभ्यासात सातत्य असावे. अधिकारी होण्याचे ध्येय उराशी बाळगणे गरजेचे आहे. कारण ध्येय समोर ठेवून प्रयत्न केल्यास नक्कीच यशस्वी होऊ शकता, असे प्रतिपादन निवृत्त पोलिस अधिकारी रमेश मोहिते यांनी केले.

प्राचार्य गोसावी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बँकिंग क्षेत्रास मन की बात मधून प्राधान्य दिले. त्यामुळे बँकिंग क्षेत्रास महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी बँकिंगच्या परीक्षा देऊन यश मिळविले पाहिजे. विविध महाविद्यालयातून कार्यशाळेस १८७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

दैनिक दिव्य मराठी दि. ८-१०-२०१६ - कॉलेज कट्टा

दै. तरुण भारत दि. १४-१०-२०१८

# स्पर्धा परीक्षा तंत्र अवगत करा : शिंदे



**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -** लक्ष्मीबाई पाटील महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचा शुभारंभ झाला. यावेळी बोलताना विद्यार्थांनी स्पर्धा परिक्षांचे तंत्र अवगत करुन चिकाटीच्या जोरावर यश संपादन करावे असे प्रतिपादन वरिष्ठ पोलीस अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी केले.

सोलापूर विद्यापिठ व लक्ष्मीबाई पाटील महाविद्यालय आयोजित मोफत स्पर्धा परिक्षा कार्यशाळा शुभारंभ करताना लक्ष्मीबाई पाटील महाविद्यालयात बोलत होते.

यावेळी व्यासपिठावरती प्राचार्य सीताराम गोसावी, उपप्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ प्रशांत नलावडे, डॉ ढवण, प्रा आनंद शिंदे, डॉ संतोष राजगुरु, पोलीस अधिकारी दत्तात्रय कोळेकर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना प्राचार्य सीताराम गोसावी म्हणाले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बँकिंग क्षेत्राला मनकी बात मधून प्राधान्य दिले आहे. विद्यार्थ्यांनी बँकींग परिक्षा देऊन यश मिळविले पाहीजे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संतोष राजगुरु यांनी तर सुत्रसंचालन प्रा देवराव मुंडे यांनी व आभार प्रदर्शन प्रा. आनंद शिंदे यांनी केले यावेळी विविध महाविद्यालयातुन १८७ विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

Scanned by CamScanner

During the Competetive Exam Workshop
Dr. Vijay Kumbhar Guidance to the Students.




Scanned by CamScanner

दैनिक **पंढरी भूषण**
जनसामान्यांचा लढवय्या सैनिक
पंढरपूर । रविवार दि. ९ ऑक्टोबर २०१६

# स्पर्धा परीक्षा तंत्र अवगत करा : बाळासाहेब शिंदे

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा तंत्र अवगत करून जिद्द, चिकाटीच्या जोरावर यश संपादन करावे, त्यासाठी उच्च स्वप्ने पाहावीत. असे प्रतिपादन वरिष्ठ पोलीस अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी दिला.

सम्राट चौकातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील युपीएससी व एमपीएससी मोफत कार्यशाळेचा शुभारंभ करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. सीताराम गोसावी होते. व्यासपीठावर पोलीस अधिकारी दत्तात्रय कोळेकर, समन्वयक प्रा. आनंद शिंदे, डॉ. संतोष राजगुरू, उपप्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा. प्रशांत नलवडे, डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. सुरेश ढेरे, निशा भोसले उपस्थित होते. ते म्हणाले, स्पर्धा परीक्षा कठीण नसते योग्य मार्गदर्शन, अभ्यास, सातत्य याची जोड असल्यास यश हमखास मिळते. परीक्षेसाठी दररोज वृत्तपत्रातील संपादकीय लेख वाचले पाहिजे. पाठ्यपुस्तके, व्याकरण, प्रश्नपत्रिका संच यांचा अभ्यास केला पाहिजे. संयम ठेऊन शिस्तीने स्मार्ट कार्य केले पाहिजे. अपयश आल्यास खचून जाऊ नये सातत्य ठेवल्यास यश नक्की मिळते.



**लक्ष्मीबाई पाटील महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मोफत कार्यशाळेचा शुभारंभाप्रसंगी प्रा. सीताराम गोसावी, वपोनि बाळासाहेब शिंदे, दत्तात्रय कोळेकर, प्रा. आनंद शिंदे, डॉ. संतोष राजगुरु आदी.**

प्रशासकीय सेवा व आयटी क्षेत्र यांची तुलना करू नये. प्रशासकीय सेवेत कमी वेतन मिळत असले तरी ती समाजसेवा आहे. म्हणून या स्पर्धेत संख्येने सहभागी होऊ नका. जिंकण्यासाठी जा. असे सांगून त्यांनी उच्च पदावर आरुढ होण्यासाठी यशाची स्वप्ने पहा, असे सांगितले. प्राचार्य गोसावी म्हणाले, पंतप्रधान मोदी यांनी बँकिंग क्षेत्रास मन की बात मधून प्राधान्य दिले आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्रास महत्त्व प्राप्त झाले विद्यार्थ्यांनी बँकिंगच्या परीक्षा देऊन यश मिळवले पाहिजे.

प्रारंभी शाहीर अमर शेख जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. संतोष राजगुरू यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. देवराव मुंडे यांनी केले तर आभार प्रा. आनंद शिंदे यांनी मानले. कार्यशाळेस प्रा. हर्षल शिंगे यांनी मार्गदर्शन केले. विविध महाविद्यालयातून कार्यशाळेस १८७ विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned by CamScanner

सोलापूर, सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित

सोलापूर

राष्ट्रीय विचारांचे दैनिक

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

RNI Regd. No. 46878/87 Postal Regd. No.G2/RNP/SLP/D/32/2015-2017. Posted daily at Medical college, solapur. P.O.

• रविवार, ९ ऑक्टोबर २०१६ • भारतीय सौर दि. १७ आश्विन १९३८ • युगाब्द ५११८ • आसमंतसह • पाने १२+८ • किंमत ५ रुपये




# स्पर्धा परिक्षेच्या यशासाठी खडतर परिश्रम आवश्यक: रमेश मोहिते

**प्रतिनिधी,**
**सोलापूर, दि. ८ ऑक्टोबर-**
स्पर्धा परिक्षेत यश संपादन करण्यासाठी खडतर परिश्रमाची गरज असते. म्हणून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाशी मैत्री करुन जीवनाची वाटचाल सुखकर करावी असे प्रतिपादन निवृत्त पोलिस अधिकारी रमेश मोहिते यांनी व्यक्त केले.

सम्राट चौकातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महलिा महाविद्यालयाने आयोजित केलेल्या एक दिवसीय स्पर्धा परीक्षा, एम.पी.एस.सी.यु.पी. कार्यशाळेचा समारोप करताना ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी प्रा. सीताराम गोसावी होते. व्यासपीठावर उपप्राचार्य. डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे, समन्वयक आनंद शिंदे, संतोष राजगुरु उपस्थित होते.

प्रास्ताविक संतोष राजगुरु यांनी केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक प्रा. हर्षद शिंगे यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. सहदेव रसाळ, बिभिषण जाधव, सचिन शिंदे यांची भाषणे झाली. आभार प्रा. आनंद शिंदे यांनी मानले. कार्यशाळेसाठी १७८ विद्यार्थी विविध महाविद्यालयातून उपस्थित होते.

Scanned by CamScanner

अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
गुरुवार, दि. १६ मार्च २०१७

# योग विद्या अवगत करा : स्नेहल पेंडसे

**▶ पाटील महाविद्यालयात राज्यस्तरीय कार्यशाळा**

✔ सोलापूर/प्रतिनिधी

प्रशासकीय कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड तणाव वाढत आहे. त्यामुळे त्यांचे मानसिक संतूलन बिघडत चालले आहे. त्यासाठी योगविद्या आत्मसात करुन त्यांनी जीवनात स्थिरता प्राप्त करावी. असे प्रतिपादन योगविद्या तज्ज्ञ स्नेहल पेंडसे यांनी केले. लक्ष्मीबाई पाटील महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय सेवक व क्रीडा शिक्षकांसाठी आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत योगविद्या चे दैनंदिन जीवनातील महत्व या विषयावर मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य सीताराम गोसावी होते. व्यासपीठावर प्रा. मनीषा टांक, प्रा. सुमन केंद्रे, प्रा. मल्लिनाथ अंजुनगीकर, प्रा. भक्तराज जाधव, प्रा. निलोफर तांबोळी महिपती निकम उपस्थित होते.

पुढे त्या म्हणाल्या की, सकाळी लवकर उठणे हे चांगल्या आरोग्याचे लक्षण आहे. त्यानंतर योग साधना करण्यापूर्वी सूर्यनमस्कार घातले पाहिजे. योग साधनेमुळे शरिरातील प्रत्येक अवयवास व्यायाम मिळतो. तेजस्वी व्यक्तीमत्वाची प्राप्ती होते. शरीर नियमित बनते. कामाचा वेग वाढतो. मनावर ताण येत नाही, दिवसभर प्रसन्नता जाणवते. मात्र त्यासाठी योग प्रकाराचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे.

प्राचार्य गोसावी म्हणाले की, नियमित योग करणारे व्यक्ती रागावर विजय मिळवते. त्याचे प्रशासकीय काम समाधान कारक असते. तो जीवनात आनंदी असतो. म्हणून दररोज योग साधना केली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, सूत्रसंचालन प्रा. मनिषा टांक यांनी केले, तर आभार प्रा. मल्लिनाथ अंजुनगीकर यांनी मानले. कार्यक्रमास राज्यभरातील ८५ प्रतिनिधी उपस्थित होते.

Scanned by CamScanner